# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – 411 018

## करआकारणी व करसंकलन विभाग

## जाहिर प्रकटन

## 'सन 2024-2025 - कर व करेत्तर बाबींचे दरपत्रक'

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 99 मधील तरतूदीनुसार मा. प्रशासक यांचेकडील मा. महापालिका सभा ठराव क्रमांक 544, दिनांक 13/02/2024 चे अनुषंगाने सन 2024-2025 करिता महानगरपालिका क्षेत्राकरिता कर व करेत्तर बाबींचे दर खालीलप्रमाणे निश्चित केले आहेत

**1 सामान्य कर :**

| करयोग्यमूल्याचा टप्पा (स्लॅब) | निवासी मालमत्ता | निवासेत्तर मालमत्ता |
|---|---|---|
| रक्कम रुपये 1/- ते 12000/- | 24% | 27% |
| रक्कम रुपये 12001/- ते 30000/- | 27% | 30% |
| रक्कम रुपये 30001/- व त्यापुढील | 35% | 37% |

**उपरोक्त निवासी मालमत्तांचे कराचे दरात साफसफाईकर - 5%, अग्निशामक कर - 2% व मनपा शिक्षण उपकर – 4% तसेच बिगरनिवासी मालमत्तांचे कराचे दरात साफसफाई कर - 6%, अग्निशामक कर - 2% व मनपा शिक्षण उपकर - 5% यांचा समावेश आहे.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2 | विशेष साफसफाईकर | करयोग्य मूल्यावर | --- | 2% |
| | **फक्त मॉल्स,लॉजिंग बोर्डिंग,मंगल कार्यालय,सभागृह,रुग्णालय,हॉटेल्स,कॅन्टीन्स,रेस्टॉरंट या स्वरुपाच्या मालमत्तांस** | | | |
| 3 | वृक्ष उपकर | करयोग्य मूल्यावर | 1% | 1% |
| 4 | मलप्रवाह सुविधा लाभकर | करयोग्य मूल्यावर | 5% | 5% |
| 5 | पाणीपुरवठा लाभकर | करयोग्य मूल्यावर | 4% | 5% |
| 6 | रस्ता कर | करयोग्य मूल्यावर | 2% | 3% |

**7 नाट्यगृहावरील कर (करमणूक कर)**

| | | |
|---|---|---|
| 1 | **सिनेमा** | |
| | अ) 500 पर्यंत किंवा त्यापेक्षा जास्त बैठक व्यवस्था (सिट्स) असणा-या थिएटरला प्रती स्क्रीन | प्रती दिवस रु.250/- |
| | ब) मराठी सिनेमा | करमाफी |
| | क) वातानुकुलित थिएटर प्रती स्क्रीन | प्रती दिवस रु.350/- |
| 2 | नाटक, सर्कस (कॉर्निव्हल टेंटस्), तमाशा, संगीत जलसे/शास्त्रीय संगीत जलसे (थियटरमधील किंवा थियटर व्यतिरिक्त प्रत्येक प्रयोगास) | प्रती प्रयोगास रु.100/- |
| 3 | कुस्त्या / मुष्टीयुध्द | प्रती खेळास रु.50/- |
| 4 | वरील खेरीज इतर प्रत्येक प्रयोगास (जर वेगवेगळे खेळ नसतील तर अशा प्रत्येक दिवसास) | प्रती दिवस रु.100/- |

**8 शिक्षण उपकर व रोजगार हमी उपकर**

महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी उपकर अधिनियम 1962 मधील तरतूदीनुसार करयोग्यमूल्यावर खालील दराने महाराष्ट्र राज्य शासनाकरिता शिक्षण व रोजगार हमी उपकर वसूल केला जातो.

| करयोग्यमूल्य टप्पा | शिक्षण उपकराचा दर | | रोजगार हमी उपकराचा दर (बिगरनिवासी) |
|---|---|---|---|
| | निवासी | बिगरनिवासी | |
| रुपये 75 ते 150/- | 2% | 4% | 1.00% |
| रुपये 151 ते 299/- | 3% | 6% | 1.50% |
| रुपये 300 ते 2999/- | 4% | 8% | 2.00% |
| रुपये 3000 ते 5999/- | 5% | 10% | 2.50% |
| रुपये 6000 व त्यापुढील | 6% | 12% | 3.00% |

9 **फ्लोअरेज कर : महाराष्ट्र [मोठया निवासी असलेल्या] इमारतीवरील कर [पुन्हा अधिनियम करणे] अधिनियम 1979 [फ्लोअरेज टॅक्स] अन्वये करयोग्यमूल्यावर 10% महाराष्ट्र राज्य शासनाकरिता वसूल केला जातो.**

## मालमत्ता करातील सवलत योजना

| अ.क्र. | लाभधारक | सवलत योजना स्वरूप | सन 2024-2025 करिता (चालू मागणीत सवलत) | भरणा कालावधी |
|---|---|---|---|---|
| 1 | आगाऊ मालमत्ताकर भरणारे | थकबाकीसह दोन्ही सहामाहीची संपूर्ण रक्कम एक रकमी आगाऊ भरणा-यां करिता | देय सामान्य कर रक्कमेच्या<br>1. निवासी / बिगरनिवासी / मिश्र / औद्योगिक / मोकळ्या जमिनी इ. मालमत्ता - 5% | माहे एप्रिल ते जून अखेर |
| 2 | महिला | फक्त महिलांचे नावे असलेल्या फक्त एका निवासी मालमत्तेस | देय सामान्यकर रक्कमेच्या 30% | माहे एप्रिल ते जून अखेर |
| 3 | दिव्यांग | 40% किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असणा-या दिव्यांग व्यक्तींचे (अंध, दिव्यांग, मतिमंद, कर्णबधिर व मूकबधिर इ.) फक्त एका मालमत्तेस | देय सामान्य कर रक्कमेच्या 50% | निरंतर |
| 4 | स्वातंत्र्य सैनिक किंवा त्यांचे पत्नी | स्वातंत्र्य सैनिक किंवा त्यांचे पत्नी यांचे फक्त एका निवासी मालमत्तेस | देय सामान्य कर रक्कमेच्या 50% | माहे एप्रिल ते जून अखेर |
| 5 | ग्रीहा : ग्रीन बिल्डींग | **ग्रीन बिल्डींग रेटींग सिस्टिम मालमत्ता**<br>**ग्रीहा** : ग्रीन बिल्डींग रेटींग सिस्टिम मधील 2500 चौ.मी. पेक्षा जास्त भूखंडावरील प्रकल्प | देय सामान्यकर रक्कमेच्या<br>• 3 Star Rating - 05%<br>• 4 Star Rating - 08%<br>• 5 Star Rating - 10% | माहे एप्रिल ते जून अखेर |
| | स्वग्रीहा : ग्रीन बिल्डींग | **स्वग्रीहा** : ग्रीन बिल्डींग रेटींग सिस्टिम मधील 2500 चौ.मी. पेक्षा कमी भूखंडावरील प्रकल्प | देय सामान्यकर रक्कमेच्या<br>• 1 Star Rating - 05%<br>• 2 Star Rating - 08%<br>• 3 Star Rating - 10%<br>• 4 Star Rating - 12%<br>• 5 Star Rating - 15% | माहे एप्रिल ते जून अखेर |
| 6 | ऑनलाईन पेमेंट RTGS, NEFT व IMPS मार्फत भरणा | ऑनलाईन पेमेंट गेट-वे, RTGS, NEFT व IMPS द्वारे भरणा करणारे मालमत्ताधारक | देय सामान्यकर रक्कमेच्या – 5% | माहे एप्रिल ते जून अखेर |
| | | | देय सामान्यकर रक्कमेच्या - 4% | माहे जुलै ते सप्टेंबर अखेर |
| 7 | कंपोस्टींग / एस.टी.पी. / झीरो वेस्ट यत्रंणा कार्यान्वित असलेल्या निवासी मालमत्ता | कंपोस्टींग यंत्रणा, एस.टी.पी. प्लांट, तसेच झिरो वेस्ट संकल्पना राबविणाऱ्या इमारतींमधील निवासी मालमत्ता | देय सामान्य कर रक्कमेच्या<br>1. ऑनसाईट कंपोस्टींग यंत्रणा कार्यान्वीत असल्यास (ओला कचरा पूर्णत: जिरविणाऱ्या)-5%<br>2. एसटीपी कार्यान्वीत असलेस - 3%<br>3. ऑनसाईट कंपोस्टींग यंत्रणा + एसटीपी कार्यान्वीत असलेस - 8%<br>4. झिरो वेस्ट संकल्पना राबविणेत येत असलेस (ओला व सुका कचरा पूर्णत: जिरविणाऱ्या)-8%<br>5. झिरो वेस्ट + एस.टी.पी. कार्यान्वीत असलेस (ओला व सुका कचरा पूर्णत: जिरविणाऱ्या) - 10% | निरंतर |
| 8 | शैक्षणिक इमारती | शैक्षणिक संस्थांच्या मालमत्तेमध्ये कम्पोस्टिंग यंत्रणा,झिरो वेस्ट संकल्पना,रेनवॉटर हार्वेस्टिंग व सौरउर्जा प्रकल्प असणाऱ्या मालमत्ता | देय सामान्य कर रक्कमेच्या<br>1. ऑनसाईट कम्पोस्टिंग-4%<br>2. झिरो वेस्ट – 7%<br>3. झिरो वेस्ट+रेनवॉटर हार्वेस्टिंग - 8%<br>4. झिरो वेस्ट+सौरउर्जा–9%<br>5. झिरोवेस्ट + रेनवॉटर हार्वेस्टिंग + सौरउर्जा–10% | निरंतर |

| अ.क्र. | लाभधारक | सवलत योजना स्वरूप | सन 2024-2025 करिता (चालू मागणीत सवलत) | भरणा कालावधी |
|---|---|---|---|---|
| 9 | महाराष्ट्र इलेक्टीक वाहन धोरण-2021 | स्वत:च्या इलेक्ट्रीक वाहनाकरिता चार्जिंग स्टेशन उभारल्यास व त्यातून इतर इलेक्ट्रीक वाहनधारकांना चार्जिंगची सुविधा उपलब्ध केल्यास, (शासन निर्णयानुसार) | मालमत्ता करात 2% सूट | निरंतर |
| 10 | शौर्य पदकधारक, | संरक्षण दलातील शौर्य पदक धारक | मालमत्ता करात (सामान्यकर, मलप्रवाह सुविधा लाभकर, पाणीपुरवठा लाभ कर, रस्ता कर) 100% सूट | निरंतर |
| 11 | अविवाहीत शहीद सैनिक, | अविवाहीत शहीद सैनिक (शासन निर्णयानुसार) | मालमत्ता करात (सामान्यकर, मलप्रवाह सुविधा लाभकर, पाणीपुरवठा लाभ कर, रस्ता कर) 100% सूट | निरंतर |
| 12 | माजी सैनिक व सैनिक विधवा/पत्नी | माजी सैनिक व सैनिक विधवा पत्नी/ (शासन निर्णयानुसार) | मालमत्ता करात (सामान्यकर, मलप्रवाह सुविधा लाभकर, पाणीपुरवठा लाभ कर, रस्ता कर) 100% सूट | निरंतर |
| 13 | चालू आर्थिक वर्षात नवीन आकारणी होणा-या मालमत्ता | चालू आर्थिक वर्षात आकारणी पुस्तकात नवीन नोंद होणा-या मालमत्तांसाठी सवलत योजना | देय सामान्य कर रक्कमेच्या निवासी / बिगरनिवासी / मिश्र / औद्योगिक / मोकळ्या जमिनी इ. मालमत्ता - 5% | परिपत्रक क्रमांक कर/मुख्य/9/कावि /327/2022, दिनांक 20/10/22 |
| 14 | सलग तीन वर्षे मालमत्ताकर भरणारे मालमत्ताधारक | प्रामाणिकपणे मागील 3 (तीन) सलग वर्षे मिळकतकराचा भरणा करणारे मालमत्ताधारक | देय सामान्य कर रक्कमेच्या 2% जादा प्रोत्साहन पर सवलत | निरंतर |
| 15 | स्वयंस्फुर्तीने मालमत्ता नोंद Ease Online Self-Assessment | "माझी मिळकत, माझी आकारणी" - स्वयंस्फुर्तीने महापालिकेच्या संकेत स्थळावरुन मालमत्ता कर आकारणीसाठी ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करणारे मालमत्ताधारक | देय सामान्यकर रक्कमेच्या - 5% | निरंतर |

**टीप :**

1. वरील अ.क्र. 1 ते 5 मधील नमूद सवलत योजनांपैकी कोणत्याही फक्त एका योजनेचा लाभ मालमत्ताधारकास घेता येईल.
2. www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर सवलत योजनांची सविस्तर माहिती व निकष यासंबंधी आदेश / परिपत्रके उपलब्ध आहेत.
3. सवलत लाभ घेणेकामी सवलतीची रक्कम वगळता उर्वरीत थकबाकीसह संपूर्ण रक्कम एक रक्कमी आगाऊ भरणे आवश्यक राहील.
4. मालमत्ता / सामान्य करातील सवलत योजना या चालू आर्थिक वर्षाचे चालू मागणीकरिता देय राहतील.
5. ऑनलाईन पध्दतीने बिल मिळो अथवा न मिळो मालमत्ताधारकास सवलतीचा लाभ घेता येईल.
6. मालमत्ता कराचे बिल www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर पाहण्यासाठी व बिल भरणेसाठी सुविधा उपलब्ध आहे.

(शेखर सिंह)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

जाहिरात क्रमांक :
क्रमांक : कर/मुख्य/9/कावि/ 101 /2024
दिनांक : 12 /03/2024